# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 October 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

विधान परिषदेवरच्या राज्यपाल नियुक्त ७ सदस्यांनी आज शपथ घेतली. यामध्ये चित्रा वाघ, विक्रांत पाटील, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, पंकज भुजबळ, इद्रिस नाईकवाडी, हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे यांचा समावेश आहे. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात या सर्वांना सदस्यत्वाची शपथ दिली. विधान परिषदेवरच्या राज्यपाल नियुक्त ५ जागा अजून रिक्त आहेत.

दरम्यान, या नियुक्त्यांना विरोध करणाऱ्या याचिकेवर आज मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ही याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी न्यायालयाने निकाल राखून ठेवलेला असताना या नियुक्त्या केल्याचं या याचिकेत म्हटलं आहे. मात्र, राज्यपाल निर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीला कोणत्याही प्रकारची हंगामी स्थगिती नव्हती किंवा सरकारनेही या नियुक्त्या करणार नाही अशी हमी दिली नव्हती. त्यामुळे १२ रिक्त जागांपैकी ७ आमदारांची नियुक्ती केल्याची माहिती राज्य सरकारने उच्च न्यायालयात दिली. या प्रकरणी अंतिम निर्णय देताना याबाबत मत नोंदवू, असं उच्च न्यायालयानं आजच्या सुनावणीत सांगितलं.

****

केंद्रीय निवडणूक आयोग आज महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करणार आहे. आज दुपारी साडे तीन वाजता यासंदर्भात पत्रकार परिषद घेणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

****

दूरसंचार आणि संबंधित तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारत वेगाने पुढे जाणाऱ्या देशांपैकी एक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आंतरराष्ट्रीय दूरसंचार महासंघ जागतिक दूरसंचार मानकीकरण परिषद २०२४ चं उद्घाटन केल्यानंतर ते आज बोलत होते. भारतात १२० कोटी मोबाइल फोन वापरकर्ते, ९५ कोटी इंटरनेट वापरकर्ते आणि जगातले ४० टक्क्यांहून अधिक रिअल-टाइम डिजिटल व्यवहार होतात, असं पंतप्रधानांनी सांगितलं. स्वस्त उपकरणे, कनेक्टिव्हिटी सर्व कानाकोपऱ्यात पोहोचणं, परवडणारा डेटा आणि डिजिटल-प्रथम या चार स्तंभांवर भारताची डिजिटल दृष्टी काम करते, असं त्यांनी सांगितलं. भारताने अवघ्या दहा वर्षात जेवढे ऑप्टिकल फायबर पसरवलं आहे, ते पृथ्वी आणि चंद्र यांच्यातल्या अंतरापेक्षा आठ पट जास्त आहे. भारत आता जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी 5G बाजारपेठ बनली असल्याचं त्यांनी नमूद केलं. या कार्यक्रमात यावर्षीच्या आठव्या इंडिया मोबाईल काँग्रेस २०२४ चं ही उद्घाटन करण्यात आलं.

****

देशाचे अकरावे राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन अशी ओळख असणारे भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची जयंती आज साजरी होत आहे. हा दिवस जागतिक विद्यार्थी दिन आणि जागतिक वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली आहे. अब्दुल कलाम यांची दूरदृष्टी आणि विचार विकसित भारताच्या संकल्पपूर्तीमध्ये महत्त्वाचं योगदान देत असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

****

राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा आजचा लातूर दौरा संभाव्य आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर रद्द झाला आहे. प्रशासनामार्फत ही माहिती कळवण्यात आली आहे.

****

पद्मश्री दया पवार प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारे दया पवार स्मृती पुरस्कार २०२४ चं वितरण येत्या २० ऑक्टोबर रोजी मुंबई इथं होणार आहे. लोकशाही संभाजी भगत हे या पुरस्कार समारंभाचे अध्यक्ष असतील. या पुरस्काराचं यंदाचं हे २६ वं वर्ष आहे. प्राध्यापक आशालता कांबळे, शाहू पाटोळे, सुकन्या शांता हे या पुरस्काराचे मानकरी असून या प्रतिष्ठानतर्फे गेल्या पाच वर्षांपासून देण्यात येणारा बलुतं पुरस्कार

अरुणा सबाने यांना देण्यात येणार आहे. दहा हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

****

नाशिक जिल्ह्यात निफाड तालुक्यातल्या कांद्याची बाजारपेठ असलेल्या पिंपळगाव बसवंत शहराला अखेरीस नगर परिषदेचा दर्जा देण्यात आला आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या वतीने या संदर्भात काल अधिसूचना जारी करण्यात आली. त्यामुळे इथली ग्रामपंचायत बरखास्त करून आता नगर परिषदेचा दर्जा मिळणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या मुदखेड पंचायत समितीला आयएसओ मानांकन प्राप्त झालं आहे. मुदखेड पंचायत समितीने केंद्र तसंच राज्य शासनाच्या महत्त्वाच्या उपक्रमात प्रभावी अंमलबजावणी, परिणामकारक पर्यवेक्षण, लाभार्थ्यांना तत्पर सेवा, झिरो पेंडन्सी अशा विविध बाबीवर विशेष लक्ष केंद्रीत केलं आहे. सामान्य प्रशासन, शिक्षण, पंचायत, कृषी आणि पशुसंवर्धन, आरोग्य, महिला आणि बालविकास, रोजगार, स्वच्छता आणि पाणी पुरवठा आदी विभागामध्ये केलेल्या प्रभावी कामगिरीची दखल या मानांकनावेळी घेण्यात आली. आयएसओ मानांकन मिळवणारी ही जिल्ह्यातली तिसरी पंचायत समिती ठरली आहे.

****